# जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

**(खनिकर्म शाखा)**

तळमजला, जयस्तंभ, रत्नागिरी 415 612

दूरध्वनी क्रमांक :- 02352-225844

ईमेल आयडी - dmocortn@gmail.com फॅक्स क्रमांक :- 02352-226250

---

**ई निवीदा क्रमांक 01/2018-19**

---

जिल्हयातील अवैध खनिज उत्खननावर आळा घालणेसाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक यांना जिल्हयामध्ये वारंवार फिरती करावी लागते यासाठी 1 वाहन मासिक भाडे तत्वावर घेणेसाठी प्रथम प्राधान्याने नोंदणीकृत संस्था / ट्रॅव्हल एजन्सी अथवा प्रवासी वाहतूक परवाना असलेबाबतचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा दाखला असलेल्या निवीदा धारकांकडून निवीदा मागणी करण्यात येत आहे. सदरची निवीदा बाबत तपशिल http://ratnagiri.gov.in या संकेतस्थळावर पाहावयास मिळेल. निवीदा धारकाने निवीदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरावयाची आहे.

**<u>संपूर्ण निवीदा माहिती</u>**

| | |
|---|---|
| 1. ऑनलाईन निवीदा नोटीस | :- दि. 02 फेब्रुवारी, 2019 सकाळी 10.00 वा. |
| 2. निवीदा कालावधी | :- अंदाजे 1 वर्ष |
| 3. बयाणा (अनामत) रक्कम | :- रूपये 10,000/- |
| 4. निवीदा फी (ना परतावा) | :- रूपये 1000/- |
| 5. ऑनलाईन निवीदा प्रसिध्दी | :- दि. 02 फेब्रुवारी, 2019 सकाळी 10.00 वा |
| 6. ऑनलाईन निवीदा स्विकारणे | :- दि. 02 फेब्रुवारी, 2019 सकाळी 10.00 वा |
| 7. ऑनलाईन निवीदा अंतिम तारीख | :- दि. 08 फेब्रुवारी, 2019 सायं. 03.00 वा. |
| 8. ऑनलाईन निवीदा उघडणे | :- दि. 11 फेब्रुवारी, 2019 सकाळी 11.00 वा |
| 9. वाहन पुरविण्याचा कालावधी | :- अंदाजे 1 वर्ष |
| 10. तांत्रिक लिफाफयातील भरण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आवश्यक प्रती जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे जमा करणेचा कालावधी | :- दि. 02 फेब्रुवारी,2019 ते 08 फेब्रुवारी,2019<br>:- सकाळी 11.00 ते सायं. 5.00 वा पर्यंत<br>(सुट्टीचे दिवस वगळून) |

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

## निवीदेबाबत अटी व शर्ती

1. निवीदा धारकाने निवीदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन भरावयाची आहे.
2. वाहन हे बोलेरो, इनोव्हा या प्रकारातील व आसनक्षमता किमान 7 सीटर असणे आवश्यक आहे.
3. वाहन अत्याधुनिक असणे आवश्यक आहे.
4. वाहन दर महिन्यात किमान 3000 कि.मी. चालेल. यापुढील अंतराबाबत प्रती कि.मी. चा दर दरपत्रकात नमूद करावा.
5. भाडयाने घेण्यात येणारे वाहन सन 2013 व त्यानंतर निर्मीतीचे वर्षानंतरचे असावे. त्या मागील वर्षातील वाहनांचा विचार केला जाणार नाही.
6. प्राधान्याने वाहाने टी परमिट (प्रवासी वाहातूक परवाना) असणे आवश्यक आहे. टी परमिट उपलब्ध न झाल्यास FULL INSURANCE POLICY कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.
7. निवीदा मंजूर झाल्यास वाहनाची सर्व मूळ कागदपत्रे व वाहन योग्य असलेचे प्रमाणित करणेसाठी सेवा अभिंयंता यांत्रिकी कार्यशाळा यांच्याकडून 7 दिवसांमध्ये तपासणी करून घेणे आवश्यक व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक
8. मंजूर दराने वैधता कालावधीमध्ये दर वाढीचा विचार होणार नाही.
9. भाडयाने पुरविलेले वाहन सदैव सुस्थितीत 24 तास नेमलेल्या मुख्यालयाच्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे., किरकोळ स्वरूपाची दुरूस्ती ही 1 दिवसात व मोठया स्वरूपाची दुरूस्ती ही जास्तीत जास्त 3 दिवसात करून घेण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची / वाहन मालकांची राहील वाहन दुरूस्तीच्या कालावधीमध्ये मक्तेदाराने पर्यायी वाहनांची व्यवस्था करणेची आहे.
10. निवीदा धारकाने इंधन, वंगण, दुरूस्ती व वाहनचालकाचा खर्च व इतर सर्व भत्ते वाहन धारक संस्थेने देणेचा आहे.
11. वाहन केवळ मंजूर निवीदा धारकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद अथवा उपलब्ध न झाल्यास व त्यामुळे प्रस्तुतच्या कामावर अनिष्ट परिणाम झाल्यास निर्धारीत संस्थेकडून झालेल्या मासिक बिलातील जी प्रतिदिवस सरासरी रक्कम होईल, त्याप्रमाणे तेवढया दिवसाची दुप्पट रक्कम त्या वाहनांच्या झालेल्या देयकातून रक्कम कापून घेतली जाईल.
12. भाडयाने घेतलेल्या वाहनाचा वापर जर अनधिकृत खाजगी प्रवासी वाहतूक करण्यासाठी केला जात असेल असे निदर्शनास आल्यास वाहन भाड्याने घेणेचा दरकरार रद्द करण्यात येईल.
13. निवीदा धारकाने आपले दर हे सर्व करांसहित दरपत्रिकेमध्ये नमूद करावेत.
14. वाहनांचा वापर ग्रामीण, डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.

15. किरकोळ अथवा मोठया स्वरूपाची दुरूस्ती ही संबंधित मंजूर निवीदा धारकाने करणेची आहे.
16. वाहन नावावर असलेबाबत प्रत्येक वाहनाची आरटीओ यांचेकडील आरसीटीसी पुस्तकाची सत्यप्रत सर्व वाहनांसोबत ठेवणेची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
17. एकदा निवीदा मंजूर झाल्यानंतर वाहन पुरवठा मंजूर झालेल्या निवीदाधारकाने वाहन पुरवठा करण्यास नकार दिला तर त्याची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल व त्यांचेवर कारवाई केली जाईल याची निवीदा धारकाने नोंद घ्यावी.
18. वाहन मालकाला जर वाहन रदद करावयाचे असेल तेव्हा , जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्या कार्यालयास 1 महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अन्यथा वाहन धारकांकडून किंवा कंत्राटधारकांकडून 1 महिन्याचे भाडे दंड स्वरूपात वसूल केला जाईल.
19. भाडयाने घेतलेले वाहन काही कारणास्तव अथवा शासनाकडून या विभागाकरीता वाहन उपलब्ध झाल्यास करारनामा रदद करण्यात येईल याची निवीदा धारकाने नोंद घ्यावी.
20. कार्यक्रमाच्या सोयीसाठी आवश्यकता असल्यास वाहनांच्या मुख्यालयाचे ठिकाण बदलल्यास बदललेल्या मुख्यालयाच्या ठिकाणी वाहन उपस्थित ठेवणे बंधनकारक राहील.
21. मंजूर वाहन धारक अथवा कंत्राटदारांकडून उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह रक्कम रू.200/-चे स्टॅम्प पेपरवर 7 दिवसांच्या आत देणे आवश्यक आहे.
22. मंजूर निवीदा धारक यांनी प्रति वाहन रू.10000-/-प्रमाणे वाहन सुरक्षा ठेव अनामत म्हणून जमा करून ठेवली जाईल.
23. सदर निवीदा प्रक्रियेमध्ये कायदेशीर वादविवाद उपस्थित झाल्यास अंतिम निर्णय निम्न स्वाक्षरीत यांचे राहातील. सबब कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाहीत.
24. वाहन भाडे तत्वावर पुरविणेकरीता आदेश प्राप्त झाल्यानंतर 7 दिवसांच्या आत वाहन उपलब्ध करून न दिल्यास आपणास दिलेला आदेश आपोआप संपुष्टात येईल व आपला ठेका रदद करण्यात येईल.
25. एखादी निवीदा अथवा सर्व निवीदा कोणतेही कारण न देता नाकारणेचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवले आहेत.
26. निवीदेस मुदतवाढीबाबतचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवले आहेत.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

# टिप :-

**लिफाफा क्रमांक 1 मध्ये आवश्यक कागदपत्रे :-**

1. वाहन सुरक्षा ठेव (अनामत) वाहन रक्कम रू.10000/-प्रमाणे व वाहन निवीदा फी ना परतावा रक्कम रू 1000/- ऑनलाईन भरणेची आहे.
2. वाहन सुरक्षा ठेव (अनामत) रक्कम भरणा मधून सूट असेल तर त्याबाबतचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.
3. नोंदणीकृत संस्था / ट्रॅव्हल्स एजन्सी बाबत प्रमाणपत्र अथवा प्रवासी वाहातूक परवाना असलेबाबतचे आर.टी.ओ./ तत्सम अधिकारी यांचा दाखल , त्याबाबतचे पुरावे जोडावेत. ते नसल्यास पूर्ण इन्शुरन्स कागदपत्रे जोडावीत.
4. पॅन कार्ड, आयकर/विक्रीकर भरणा केल्याबाबतचे पुरावे अथवा आयकर आणि विक्रीकर निपटारा प्रमाणपत्र मिळण्यासाठी सक्षम अधिका-याकडे केलेल्या अर्जाची पोहोच पत्राची प्रमाणित छायाप्रत.
5. भाडयाने लावण्यात येणा-या वाहनांची आर.सी व इन्शुरन्स कागदपत्रे
6. निवीदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे त्याचा नमुनासोबत दिला आहे.

**तांत्रिक लिफाफा क्रमांक 1 :-** मधील आवश्यक कागदपत्रांची सूची नसेल तर लखोटा क्रमांक 2 उघडला जाणार नाही.

**लिफाफा क्र.2 :-** मध्ये पुरवठा दाराचे नाव व फक्त दर भरावेत.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

# प्रतिज्ञापत्र

1. मी / आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करतो की, जिल्हा खनिकर्म शाखा या अंतर्गत तपासणी साठी व फिरतीसाठी मासिक भाडे तत्वावर नोंदणीकृत संस्थेकडून / ट्रॅव्हल एजन्सी अथवा प्रवासी वाहतूक परवानाधारकांडून मागणी करण्यात येत असलेल्या कामाची निवीदामधील अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचले असून या निवीदेसाठी मी / आम्ही आमचे दर निवीदेसोबत असलेल्या दरपत्रक (लिफाफा क्र.2) मध्ये नमूद करीत नाहीत.
2. या निवीदेमधील वाहनाकरीता मी / आम्ही निवीदा भरत आहे.
3. जर माझी / आमची निवीदा स्विकारणेत आली तर या निवीदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू या अटी व शर्तींचे भंग केल्यास मी आपण केलेल्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहीन.
4. ही निवीदा स्विकृत झाल्यास मी / आम्ही दिलेल्या दराप्रमाणे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) समन्वय, रत्नागिरी यांचेशी केलेल्या करारनाम्या प्रमाणे स्विकृत केलेल्या दराने मासिक भाडे तत्वावर वाहन पुरवठा करण्यास मी / आम्ही बांधील आहोत.
5. निवीदेतील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही आम्हास मान्य आहेत.

निवीदा धारकाची सही व शिक्का

नाव :-

स्थळ :-

दिनांक :-

# दरपत्रक

| अ.क्र. | वाहन प्रकार | प्रति महाचा दर | 3000 धावेपुढील प्रति कि.मी. दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

निवीदा धारकाची सही व शिक्का

नाव :-

स्थळ :-

दिनांक :-